**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचं वितरण/ राज्यातला अर्णव महर्षी आणि क्रिकेटपटू वैभव सुर्यवंशीचा विजेत्यांमधे समावेश

- तरुणांना राष्ट्र उभारणीच्या कार्यात केंद्र स्थानी ठेवून देशात धोरणं आखली जात असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- दावा न केलेले २ हजार कोटी रुपये खातेदारांना परत करण्यात देशातल्या वित्तीय यंत्रणांना यश

**आणि**

- श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या टी-ट्वेंटी सामन्यात भारत मजबूत स्थितीत

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज नवी दिल्ली इथं 'वीर बाल दिना'निमित्त प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचे वितरण केलं. या वर्षी १८ राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांतल्या मिळून २० मुलांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात राष्ट्रपती म्हणाल्या, पुरस्कार विजेत्या मुलांनी शौर्य, कला आणि संस्कृती, पर्यावरण, नाविन्यपूर्ण संशोधन, तसंच विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसह विविध क्षेत्रांत असाधारण योगदान दिलं आहे.

**... होल्ड- बाईट- राष्ट्रपती**

छत्रपती संभाजीनगरचा अर्णव महर्षी याचा या पुरस्कारविजेत्यांमधे समावेश आहे. अर्धांगवायू झालेल्या रुग्णांसाठी विकसित केलेल्या उपकरणासाठी त्याला गौरवण्यात आलं.

**होल्ड - अर्णव महर्षी - -**

क्रिकेटपटू वैभव सुर्यवशींचाही राष्ट्रपतींनी आज गौरव केला.

**<><><><><>**

तरुणांना राष्ट्र उभारणीच्या कार्यात केंद्रस्थानावर ठेवून सरकारची धोरणं आखली जात आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. ते आज नवी दिल्लीत वीर बाल दिवस कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. तरुणांची प्रतिभा, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांना वाव देण्याच्या दृष्टीने सरकार त्यांना उत्तम संधी देण्यासाठी वचनबद्ध आहे, असं मोदी यावेळी म्हणाले.

**होल्ड... बाईट - नरेंद्र मोदी (३८ सेकंद)**

१९९५ नंतर जन्मलेली मुलं देशाचं नेतृत्व करून त्याला विकसित राष्ट्र बनवण्याच्या ध्येयाकडे घेऊन जातील, असं त्यांनी सांगितलं. संपूर्ण देश आज साहिबजादा बाबा जोरावर सिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या अतुलनीय शौर्य आणि त्यागाचं स्मरण करत असल्याचं प्रतिपादन मोदी यांनी केलं. यावेळी त्यांनी राष्ट्रीय बाल पुरस्काराच्या २० विजेत्यांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत गुरूद्वारा गुरू तेग बहादूर दरबार इथं वीर शहीद साहिबजादे यांना अभिवादन करून त्यांच्या अद्वितीय शौर्याचे स्मरण केले. भारत देश आणि संपूर्ण मानवता कधीही साहेबजादे यांच्या बलिदानांना विसरणार नाही, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

येत्या ५ वर्षात मुंबई, पुणे, नागपुरसह एकूण ४८ मोठ्या शहरांमधून सुटणाऱ्या रेल्वे गाड्यांची प्रवासी क्षमता दुप्पट करण्याचं रेल्वेचं नियोजन आहे. उपनगरी आणि लांब पल्ल्याच्या, अशा दोन्ही गाड्यांच्या प्रवासी क्षमतेत ही वाढ होणार आहे. त्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना रेल्वे मंडळाचे अध्यक्ष सतीश कुमार यांनी सर्व विभागीय रेल्वे कार्यालयांना दिल्या आहेत. त्यासाठी शहरी भागात नवीन टर्मिनलची उभारणी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

विविध बँक आणि इतर खात्यांमध्ये पडून असलेले पैसे खातेदारांना परत करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्रालयाकडून देशभरात विशेष मोहिम सुरू आहे. यामुळं आतापर्यंत २ हजार कोटी रुपये खातेधारकांना परत मिळाले आहेत, अशी माहिती अर्थ मंत्रालयानं आज दिली. विविध बँक खाती, वीमा खाती, म्युच्युअल फंड, लाभांश, समभाग आणि सेवानिवृत्तीचे लाभ यासाठी ही रक्कम नागरिकांनी वाचवून ठेवली होती. भारतीय बँकांमध्ये अशाप्रकारचे ७८ हजार कोटी रुपये पडून आहेत, ज्यावर कोणीही दावा केलेला नाही. म्युच्युअल फंडात दावा न केलेले असे १२ हजार कोटी रुपये आहेत, अशी सरकारी आकडेवारी आहे.

<><><><><>

अगरबत्तीसाठी भारतीय मानक ब्युरोनं नवीन गुणवत्ता मानक जाहीर केलं आहे. यात अगरबत्ती उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या घातक कीटकनाशकांवर आणि रसायनांवर बंदी घातली आहे. भारताचा ८ हजार कोटी रुपयांचा अगरबत्ती बाजार विस्तारण्यासाठी आणि ग्राहकांच्या आरोग्याची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी हे निकष जाहीर झाले आहेत. भारताचा अगरबत्ती उद्योग दरवर्षी सुमारे बाराशे कोटी रुपयांची उत्पादने अमेरिका, मलेशिया, नायजेरिया, ब्राझील आणि मेक्सिको यांसारख्या १५० हून अधिक देशांमध्ये निर्यात करतो.

<><><><><>

कर्नाटकातल्या म्हैसूर पॅलेस जवळ काल झालेल्या हेलियम सिलिंडरच्या स्फोटामुळं मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या आता दोनवर पोचली आहे. मृतांमध्ये गंभीर जखमी झालेल्या एका महिलेचा समावेश आहे. या दुर्घटनेत अन्य काही नागरिकही जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे.  कर्नाटकचे गृहमंत्री डॉ. जी परमेश्वर यांनी या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे आणि त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे

आदेश दिले आहेत. कर्नाटकच्या पर्यटन विभागानं आवश्यक कार्यवाही करायला सुरुवात केली असल्याची माहितीही परमेश्वर यांनी यावेळी दिली.

**<><><><>**

केरळमध्ये आज महापौर आणि नगराध्यक्षपदांच्या निवडणुका पार पडल्या. यात तिरुवनंतपुरम महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार व्ही. व्ही. राजेश यांनी महापौरपद मिळवले. ते भाजपाचे केरळमधले पहिले महापौर आहेत. कोची, कोल्लम आणि कन्नूर महानगरपालिकांमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफच्या उमेदवारांची महापौरपदी निवड झाली आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारने स्मार्ट फोन आणि समाज माध्यम ॲपसाठी नवीन नियम लागू केल्याचा दावा करणारा लेख खोटा आणि दिशाभूल करणारा असल्याचं सरकारने स्पष्ट केलं आहे. पत्र सूचना कार्यालयाच्या तथ्य पडताळणी विभागाने हा दावा खोटा असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><>**

भारतीय नागरिकांना एच वन बी व्हिसा मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या याकरता अमेरिकेबरोबर चर्चा सुरू असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी आज नवी दिल्लीत सांगितलं. व्हिसाकरता विलंब होतो, मुलाखतींची वेळ बदलली जाते, या आणि अशा इतर अडचणींमुळे भारतीय नागरिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांनाही त्रास होत असल्याचं विशेषतः त्यांच्या शिक्षणात खंड पडत असल्याचं वेळोवेळी अमेरिकेच्या संबंधित विभागांना पत्र लिहून कळवलं आहे, असं ते म्हणाले.

बांगला देशात अल्पसंख्य समाजाचा छळ होत असल्याबद्दल भारताने  तीव्र चिंता व्यक्त केली आहे असं त्यांनी सांगितलं. या घटनेतल्या गुन्हेगारांना न्यायालयासमोर आणून शिक्षा केली पाहिजे, असं ते म्हणाले. बांगला देशातल्या

विद्यमान सरकारच्या काळात अल्पसंख्यकांवर हल्ल्याचे दोनहजार ९०० गुन्हे नोंदले गेले असल्याची माहिती त्यांनी दिली. बांगला देशात मुक्त, न्याय्य, समावेशक निवडणूक व्हावी अशीच भारताची भूमिका असल्याचं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

कॅनडात भारतीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी भारतीय अधिकारी त्याच्या कुटुंबाशी तसंच स्थानिक प्रशासनाबरोबर संपर्कात आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, भारत आणि श्रीलंका यांच्यातल्या तिसऱ्या टी ट्वेंटी सामन्यावर भारतानं पूर्वार्धातच चांगली पकड घेतली आहे. तिरुअनंतपुरममध्ये सुरू असलेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला, तो अचूक ठरल्याचं दिसत आहे. श्रीलंकेचे आघाडीचे ३ फलंदाज झेलबाद झाले. त्यामुळे ६ षटकात ३ बाद ३२ अशी श्रीलंकेची स्थिती झाली.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा श्रीलंकेच्या १६ व्या षटकात ६ बाद ९० धावा झाल्या होत्या.

<><><><><>

सिरिया मधल्या हॉम्स जवळच्या एका मशिदीत झालेल्या स्फोटामुळं ५ जण मृत्युमुखी पडले असून २१ जण जखमी झाले आहेत. मशिदीत नमाज सुरु असतानाच हा स्फोट झाल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे.

//<><><><><>//